अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचे कार्यालय, ९१
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०० ०३०
दुरध्वनी क्र. २४९२१२१२, २४९२२६१८
E-mail addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :- २७/०७/२०२६

**-: प्रेसनोट :-**

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | बृहन्मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | २०/२०२६ |
| कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी लोकसेवक | श्री. अनिल जाधव, पोलीस अंमलदार, खार पोलीस ठाणे, मुंबई |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रू. ५,०००/- लाचेची मागणी |
| पडताळणी दिनांक | दिनांक २२/१२/२०२५ |
| लाच स्विकारलेली रक्कम | नाही |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे झुणकाभाकर केंद्रास परवानगी असलेल्या जागेवर भाडेतत्वावर हॉटेल चालवितात. दिनांक १५/१२/२०२५ रोजी खार पोलीस ठाणेचे पोलीस अंमलदार श्री. अनिल जाधव यानी तक्रारदार यांचे नमूद हॉटेलमध्ये जावून त्यांना सांगितले की, हॉटेल सुरु ठेवायचे असेल तर दरमहा रक्कम रु. २,५००/- लाच दयावी लागेल. तसेच मागील ०४ महिन्यांचे रु. १०,०००/- दयावे लागतील. परंतू तक्रारदार यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २२/१२/२०२५ रोजी ला.प्र.वि. कार्यालयात समक्ष हजर राहून लोकसेवक यांच्याविरूध्द लेखी तक्रार केली आहे.<br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २२/१२/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. अनिल जाधव, खार पोलीस ठाणे, मुंबई यांनी तक्रारदार यांना हॉटेल चालू ठेवण्याकरीता रु.५,०००/- लाचेची मागणी करुन ती स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. म्हणुन उपरोक्त नमूद लोकसेवक यांच्याविरूध्द कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

तपास अधिकारी :- श्रीमती रजनी उंबरकर, पोलीस निरीक्षक

मार्गदर्शक अधिकारी :- श्री. संदिप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( अजित सुर्के )
सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क** :- **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**हेल्पलाईन क्र.** :- **1064,** **दूरध्वनी क्र.** :- **022-24921212,**
**फॅक्स क्र.** :- **022-24922618** **व्हॉट्सअप क्र.** :- **8828241064**
**वेबसाईट** :- **acbmaharashtra.gov.in,**
**ईमेल** :- **addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**